महाराष्ट्र शासन

# ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे

जयप्रकाश नारायण रोड, पुणे रेल्वे स्टेशन जवळ, पुणे-४११ ००१
(इमारत व दळणवळण विभाग)
दुरध्वनी क्र.२६१२८००० विस्तार-२४२४ संकेतस्थळ- http:/www.bjmcpune.org फॅक्स क्र.२६१२६८६८

जा.क्र.ससरु/इवद/पाणीटाकीस्वच्छता/दरपत्रके/८७७२ /२०१९ दि.:-८/११/२०१९

प्रति,

ऑनलाईन प्रसिध्दीकरीता

विषय :- ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथील १२ लक्ष लिटरची मुख्य पाण्याची टाकी व मुख्य इमारतीवरील ५ हजार लिटरच्या पाण्याच्या टाकींची स्वच्छता करण्यासाठी दरपत्रके मागणून ठेकेदार नेमणेबाबत.

संदर्भ :- दि.०६.११.२०१९ ची मान्य टिप्पणी.

महोदय,

उपरोक्त विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, या रुग्णालयाच्या आवरातील १२ लक्ष लिटर क्षमता असलेली मुख्य पाण्याची टाकी व मुख्य इमारतीच्या छतावर असलेले १० लिटर क्षेमतेच्या एकूण १८ टाक्या सहा महिन्यांमधून एकदा स्वच्छ करण्यासाठी ३ वर्षे कालावधीसाठी खालील अटी व शर्तीनुसार अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे या नावाने दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

१) या रुग्णालयाच्या आवरातील १२ लक्ष लिटर क्षमता असलेली मुख्य पाण्याची टाकी
२) मुख्य इमारतीच्या छतावर असलेले १० लिटर क्षेमतेच्या एकूण १८ पाण्याच्या टाक्या.

तरी आपण आपल्या कंपनीचे दरपत्रक दि.२७/११/१९ दुपारी ३.०० वाजेपर्यंत या कार्यालयास सादर करावे.

अंतिम दिनांकानंतर आलेले दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

आपला,

अधिष्ठाता,
ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे.

अटी व शर्ती :-

१) सदरचे पाणी टाकी स्वच्छ करण्याचे काम पुणे महानगरपालिका पाणी टाकी स्वच्छता नियमानुसार करणे आवश्यक आहे.
२) देयकाची रक्कम आपल्या बँक खात्यात सी.एम.पी. प्रणालीव्दारे जमा केली जाईल. त्यासाठीची प्रक्रिया कंपनीने पूर्ण करणे आवश्यक राहील.
३) कोणतेही दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार अधिष्ठाता यांनी राखून ठेवलेला आहे.
४) सदर कामाचा दर्जा उत्तम असणे आवश्यक आहे.
५) कामाचा दर्जा योग्य असल्यासच देयक अदा केले जाईल.
६) काही तांत्रिक कारणांमुळे देयक अदा करण्यास उशिर झाल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही तसेच उशिराच्या देयक अदायगिबाबत व्याज आकारता येणार नाही.



Scanned by CamScanner